# ७. मुग्धा लिहू लागली


मुग्धाच्या शाळेत चित्रकला, रांगोळी, कथाकथन स्पर्धा झाल्या. आज शाळेत बक्षीस समारंभ होता. सर्व मुलांना आणि त्यांच्या पालकांनाही आमंत्रण होते. मुग्धा आणि तिचे आईबाबाही शाळेत आले होते. त्यांनी मुग्धाच्या बाईंची भेट घेतली.

''काय म्हणतेय आमची मुग्धा ?'' आईने बाईंना विचारले.

''अभ्यासात हुशार आहे. चित्रकला स्पर्धेत पहिल्या नंबरचं बक्षीसही पटकावलंय, पण ती जास्त बोलत नाही. घरीही अशीच वागते का ?'' बाई म्हणाल्या.

''हो.'' आईने नाराजीच्या स्वरात उत्तर दिले.

तेवढ्यात प्रमुख पाहुणे आले. जो तो आपापल्या जागेवर जाऊन बसला. मुग्धा व तिचे आईबाबाही खुर्चीत जाऊन बसले. बाई कार्यक्रमाच्या पुढील तयारीला लागल्या.



पाहुणे म्हणून, एक प्रसिद्ध लेखक आले होते. बाईंनी त्यांचे स्वागत केले. शाळेतील शिक्षिका जाधवबाईंनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. बक्षिसे देण्याचा कार्यक्रम पार पडला. प्रमुख पाहुण्यांनी भाषणास सुरुवात केली. प्रथम त्यांनी बक्षीस मिळवणाऱ्या मुलांचे अभिनंदन केले व बक्षीस न मिळवणाऱ्या मुलांचेही कौतुक केले. बक्षीस मिळवलेल्यांमध्ये मुग्धाचाही नंबर होता. मुग्धा मन लावून प्रमुख पाहुण्यांचे भाषण ऐकू लागली. पाहुण्यांनी त्यांच्या लहानपणीच्या गमतीजमती सांगितल्या. सर्व मुले पोट धरून हसली. नंतर ते स्वतः लेखक कसे झाले, हे त्यांनी सांगितले.

ते म्हणाले, ‘‘मला पहिल्यापासून लिहिण्याचा छंद होता, मात्र मी फार अबोल होतो. मी कोणाशीही जास्त बोलत नसे. रोज ज्या गोष्टी घडायच्या, त्या मी माझ्या वहीत लिहून काढायचो. अगदी बारीकसारीक गोष्टी मी त्यात लिहीत असे. दिवसभर झालेल्या गोष्टी आठवून आठवून मी वहीत रोज रात्री लिहून काढत असे. मला तो छंदच लागला होता. रोज वहीत लिहिल्याशिवाय मला झोप येत नसे. उठल्यापासून झोपेपर्यंत ज्या ज्या गोष्टी मी स्वतः केल्या, नित्यक्रम सोडून ज्या ज्या गोष्टी माझ्या नजरेत आल्या, त्या सर्व मी लिहू लागलो. त्यामुळे माझी निरीक्षणशक्ती वाढली. स्मरणशक्ती वाढली. माझी शब्दसंपत्ती वाढली. छोटेछोटे प्रसंग, उदाहरणार्थ, शाळेतल्या घटना, बागेतील चिंचा, बोरे हळूच कोणाच्याही नकळत काढणे, लहानसहान खोड्या, माझ्या हातून घडलेल्या चुका, ताईशी भांडण, मार चुकवण्यासाठी केलेला अभिनय, सहलीची मजा, विनोदी प्रसंग, अचानक उद्भवलेलं संकट अशा अनेक गोष्टी मी वहीवर उतरवू लागलो. पुढे मला काही कल्पना सुचू लागल्या. घडलेल्या प्रसंगांवरून मी कविता, कथा लिहू लागलो. माझ्या शाळेतल्या शिक्षकांना दाखवू लागलो. ते माझं कौतुक करू लागले. त्यांच्यामुळे मला प्रोत्साहन मिळत गेलं.

‘‘थोडा मोठा झाल्यावर दैनिकांत, मासिकांत लिखाण प्रसिद्ध होऊ लागलं. लिखाण करता करता माझ्या असं लक्षात आलं, की मी सर्वांशी छान गप्पा मारू शकतो आणि मी सर्वांशी बोलू लागलो. विशेष म्हणजे सर्वांशी गप्पा मारल्यानं लिखाणासाठी मला विषय सुचत गेले. माझे काका एकदा मला म्हणाले, ‘हा घुम्या मुलगा चांगलाच बोलू लागलाय.’ बोलण्यानं, लिहिण्यानं, वाचल्यानं माझ्यात परिवर्तन घडत गेलं. माझ्या आयुष्याला एक वेगळंच वळण मिळालं आणि मी एक साहित्यिक झालो.’’

पाहुण्यांचे भाषण ऐकून मुग्धा अगदी मुग्ध झाली. तिने मनाशी निश्चय केला, ‘आपणही रोज लिहायचं.’ नेमका हाच विचार तिच्या आईबाबांच्याही मनात आला.

नुकतीच बाबांनी मुग्धाला नवीन वर्षाची एक डायरी (रोजनिशी) दिली होती. अजून ती कोरीच होती.



मुग्धाने मनाशी पक्के ठरवले, नवीन वर्षाचा संकल्प केला, की ‘रोज काहीतरी लिहायचंच.’ दुसऱ्या दिवसापासून तिने लिखाणाला सुरुवात केली.

रोजच्या रोज तिच्या डायरीची पाने भरू लागली. आजीचं वर्णन, बाबांचे अभ्यास घेणे, भाऊशी भांडण, मैत्रिणीचा वाढदिवस, आईची माया, तिच्या शिक्षिका, सुट्टीचा दिवस अशा अनेक विषयांचे लेखन डायरीच्या कागदांवर झरझर उतरू लागले. एखादी गोष्ट मनासारखी किंवा मनाविरुद्ध झाली, की तीही कागदावर येऊ लागली. त्यामुळे तिची चूकही तिला कळू लागली.

आपोआप आईबाबांशी, भावाशी सुसंवाद घडू लागले. मुग्धाची अबोल कळी फुलायला लागली आणि गप्पगप्प राहणारी मुग्धा मोकळेपणाने बोलू लागली, लिहू लागली.

**– निर्मला मठपती**

**शब्दार्थ :** **नित्य** – नियमित, रोज. **अभिनय** – हावभाव करून मनातला भाव व्यक्त करणे. **दैनिक** – रोज प्रसिद्ध होणारे. **मासिक** – दर महिन्याला प्रसिद्ध होणारे. **घुम्या, अबोल** – कमी बोलणारा. **परिवर्तन** – बदल. **संकल्प करणे** – निश्चय करणे, ठरवणे. **सुसंवाद** – चांगली चर्चा.

## स्वाध्याय

### प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) मुग्धाच्या शाळेत कोणता समारंभ होता ?

(आ) समारंभाला प्रमुख पाहुणे कोण आले होते ?

(इ) बाबांनी मुग्धाला नवीन वर्षात काय दिले होते ?

(ई) मुग्धाला आपली चूक का कळू लागली ?

### प्र. २. कोण, कोणास म्हणाले ?

(अ) ''चित्रकला स्पर्धेत पहिल्या नंबरचं बक्षीसही पटकावलंय, पण ती जास्त बोलत नाही.''

(आ) ''मला पहिल्यापासून लिहिण्याचा छंद होता.''

(इ) ''हा घुम्या मुलगा चांगलाच बोलू लागलाय.''

(ई) ''आणि मी एक साहित्यिक झालो.''

### प्र. ३. कंसात दिलेल्या शब्दांपैकी योग्य शब्द निवडून वाक्ये लिहा.

(संकल्प, अबोल, परिवर्तन, मुग्ध, मनाशी, गमतीजमती)

(अ) पाहुण्यांनी त्यांच्या लहानपणीच्या ................ सांगितल्या.

(आ) बोलण्यानं, लिहिण्यानं, वाचल्यानं माझ्यात ................ घडत गेलं.

(इ) त्या पाहुण्यांचे भाषण ऐकून मुग्धा अगदी ................ झाली.

(ई) मुग्धाने ................ पक्के ठरवले, नवीन वर्षाचा ................ केला.

(उ) मुग्धाची ................ कळी फुलायला लागली.

### प्र. ४. खालील शब्दांना जोडून येणारे शब्द लिहा.

**उदा.,** गमतीजमती

| | |
|---|---|
| (अ) बारीक.................... | (ई) दगड..................... |
| (आ) जिकडे.................... | (उ) चढ..................... |
| (इ) काटे.................... | (ऊ) पाला.................... |

**प्र. ५. खालील शब्दांच्या सुरुवातीला कंसात दिलेले योग्य अक्षर/शब्द लावून नवीन शब्द तयार करा.**

**उदा.,** बोल – अबोल

(सु, गैर, अ)

(अ) संवाद (आ) हजर ( इ ) न्याय

**प्र. ६. एकाच शब्दाला दोन वेगवेगळी अक्षरे लावली, की दोन वेगवेगळे शब्द तयार होऊ शकतात. त्यांचा अर्थ एकमेकांच्या विरुद्ध असू शकतो. उदा., संवाद या शब्दापासून सुसंवाद आणि विसंवाद असे विरुद्ध अर्थाचे शब्द बनू शकतात. आता खालील शब्दांना वेगवेगळी अक्षरे लावून विरुद्ध अर्थाचे शब्द बनवा. त्यासाठी 'सु', 'अ', 'कु' ही अक्षरे वापरा.**

(अ) **स्पष्ट** → **अस्पष्ट**, **सुस्पष्ट**

(आ) **प्रसिद्ध** → .....प्रसिद्ध, .....प्रसिद्ध

(इ) **योग्य** → ..........., ............

अशा शब्दांच्या आणखी काही जोड्या शोधण्याचा प्रयत्न करा.

**प्र. ७. खालील जोडाक्षरांसारखे शब्द लिहा.**

(अ) पक्के

(आ) संपत्ती

**प्र. ८. खालील शब्द पाहा. तसेच लिहा.**

मुग्धा, बक्षीस, आमंत्रण, खुर्ची, गोष्टी, प्रसंग, परिवर्तन, शब्दसंपत्ती, नित्यक्रम, निश्चय, संकल्प, प्रोत्साहन, कौतुक, वर्णन, मैत्रिणी, मनाविरुद्ध, कल्पना, प्रसिद्ध.

**उपक्रम :**

१. वर्तमानपत्रे, मासिके यांत येणारे विनोद शोधा व लिहा.
२. तुम्हांला आवडलेले विनोद इतरांना सांगा.
३. तुमच्या आजूबाजूला घडणाऱ्या घटना, प्रसंग लिहून वर्गाचे वार्तापत्र तयार करा.
४. तुमच्या आजूबाजूला कोण कोण राहते, तुम्ही शेजाऱ्यांकडे केव्हा केव्हा जाता, कोणत्या विषयांवर गप्पा मारता, ते वर्गात सांगा.

**प्रकल्प :** वेगवेगळ्या पाठ्यपुस्तकांतील तसेच परिसरातील उपलब्ध मजकुरातील जोडाक्षरयुक्त शब्दांची यादी तयार करा. त्यांचे खालील सूचनेनुसार गट करा.

- 'य' जोडून येणारी जोडाक्षरे – वाक्य, धान्य.
- एकच अक्षर दोन वेळा असलेली जोडाक्षरे – अन्न, गप्पा, लठ्ठ.
- 'र' ची जोडाक्षरे – ट्रक, चक्र, कैऱ्या, मित्र, सूर्य.

## कोण बोलतं ते आम्ही शोधतो

• **वाचा.**

मुलांनो, सगळे भरभर चाला. परिपाठाच्या आधी केंद्रशाळेत पोचायला पाहिजे. स्पर्धा सुरू होतील लगेचच. पुढे गेलेल्या बाई मागे वळत म्हणाल्या. केंद्रस्तरीय खेळांच्या स्पर्धांसाठी त्या शाळेतल्या मुलांना घेऊन निघाल्या होत्या. मयूर म्हणाला मी डब्यात गुळाची पोळी आणलीय. मी अंड्याची पोळी आणि चपाती आणलीय जया म्हणाली. माझ्या डब्यात फोडणीचा भात आणि फोडणीची भाकरी आहे. – सायना. अरेऽऽ माझा डबाच घरी विसरला. आता मी काय खाणार ? मला उपाशीच राहावं लागणार बहुतेक. अभिजीत चिंतेने म्हणाला. का? आम्ही आहोत की. सायना आणि जया एकदम बोलल्या. आणि मी पण. मयूर म्हणाला. बोलत बोलत सगळे केंद्रशाळेच्या दारात आले. बाईंनी हुश्श केले.

हा प्रसंग नीट वाचा. कोणी डब्यात काय आणलं, कोण उपाशी राहायची चिंता करू लागला हे पटकन सांगता येतं का ? समजा हा प्रसंग नाटकात, टीव्हीवर किंवा चित्रपटात दाखवला असता, तर कोण, कुणाला काय बोलतंय ते आपल्याला नक्की कळलं असतं; पण लिहिताना काय करायचं? कोण बोलतंय हे लेखनातून स्पष्ट व्हावं म्हणून ‘‘.....’’ असे चिन्ह वापरतात. त्यामुळे कोण काय बोलतंय ते समजायला मदत होते.

आता हाच प्रसंग ‘‘——’’ असे चिन्ह देऊन लिहिला आहे. तो वाचा.

तुमच्या वर्गात कुणीही बोललेली चार ते पाच वाक्ये ‘‘——’’ असे चिन्ह वापरून लिहा.

‘‘मुलांनो, सगळे भरभर चाला. परिपाठाच्या आधी केंद्रशाळेत पोचायला पाहिजे. स्पर्धा सुरू होतील लगेचच.’’ पुढे गेलेल्या बाई मागे वळत म्हणाल्या. केंद्रस्तरीय खेळांच्या स्पर्धांसाठी त्या शाळेतील मुलांना घेऊन निघाल्या होत्या.

मयूर म्हणाला, ‘‘मी डब्यात गुळाची पोळी आणलीय.’’ ‘‘मी अंड्याची पोळी आणि चपाती आणलीय.’’ जया म्हणाली. ‘‘माझ्या डब्यात फोडणीचा भात आणि फोडणीची भाकरी आहे.’’ सायना. ‘‘अरेऽऽ माझा डबाच घरी विसरलाय. आता मी काय खाणार? मला उपाशीच राहावं लागणार बहुतेक.’’ अभिजीत चिंतेने म्हणाला. ‘‘का? आम्ही आहोत की.’’ सायना आणि जया एकदम बोलल्या. ‘‘आणि मी पण.’’ मयूर म्हणाला.

बोलत बोलत सगळे केंद्रशाळेच्या दारात आले. बाईंनी हुश्श केले.